| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | शासकीय रोपवाटिकाचे बळकटीकरण करणे . सन २००९ - १० |
| २ | योजनेचा उद्देश | राज्यातील हवामरल फळझाडे लागवड करण्यास अनुकूल आहे. फळांच्या उत्कृष्ट बागा स्थापन करण्यासाठी जातीवंत व गुणवान कलमा रोपांचा पुरवठा आवश्यक असतो. त्या अनुषंगाने राज्यात जिल्हा व तालुका फळरोप वाटिकांची स्थापना करण्यात आली असुन विविध जातीवंत मातृवृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या मातृवृक्षापासून तयार केलेली कलमे / रोपे उत्पादन विकास कार्यक्रमाखाली विविध योजनाद्वारे गरजू शेतकऱ्यांना शासन निर्धारीत दराप्रमाणे उपलब्ध करुन देणे व फळ विकास करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी कलमे / रोपे उत्पादनासाठी आवश्यक साहित्ये खरेदी करुन देणे व रोप वाटिकेवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. रोप वाटिका बळकट करुन कलमे रोपे उत्पादन करण्यासाठी गौण बांधकाम करण्यासाठी निधी प्रस्तावीत आहे. त्याच प्रमाणे सुधारीत मशागत पध्दतीचा अवलंब करुन फळरोपवाटिकेतील उत्पादन वाढविण्यासाठी सर्व फळरोप वाटिकांचा प्रात्यक्षिक केंद्र म्हणुनही उपयोग केला जात आहे. जन जाती क्षेत्रातील शेतकऱ्यांना फलोत्पादन विकास योजनेत समाविष्ट करुन घेण्यासाठी आदिवासी क्षेत्रात फळरोपवाटिका स्थापन केल्या असुन त्यावरील रोप वाटिके वरील कलमे रोपे आदिवासी शेतकऱ्यांना पुरविण्यात येत आहे. |
| ३ | योजनेचे स्वरुप | राज्य पुरस्कृत |
| ४ | केंद्र पुरस्कृत असल्यास केंद्र:राज्य हिस्सा | १०० टक्के राज्य पुरस्कृत |
| ५ | योजनेचे घटक | कलमे / रोपे उत्पादनासाठी आवश्यक साहीत्य खरेदी करणे. रोपवाटीकेवर अस्तीस्वात असलेल्या मातृवृक्षा मध्ये नवीन व संकरीत जातीच्या विविध फळझाडांच्या मातृ वृक्षांची लागवड करणे. रोप वाटीकेचे क्षेत्र विकसित करणे, रोपवाटिकेवरील उपलब्ध सिंचन क्षमतेत वाढ करणे व कार्यक्षमता वाढविणे. फळरोप वाटिकेवर पॉवरस्पेअर, डस्टर, फॉगर्स, ट्रॅक्टर्स इत्यादि यांत्रिक सुविधात वाढ करणे, दुरुस्त करणे व कार्यक्षमता वाढविणे, मनुष्यवळाचा विकास करणे. रोपवाटिकेवरील मनुष्यबळ व साधनसंपत्ती व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे कलमे रोपांच्या उत्पादनात गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे. |
| ६ | जिल्हा पातळिवर योजना राबविणारे अधिकारी | अ) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| | कृषि चिकित्सालय | पुरक उत्पादने - नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील कृषि चिकित्सालयामध्ये पुरक उत्पादने जसे गांडुळ खत , गांडुळ कल्चर, निमकेक, निमपावडर, जिवामृत, युरीया ब्रिकेट , दशपर्णी अर्क, बायोडायमनीक कल्चर इ. चा पुरवठा पुरक उत्पादने तयार केली जातात. तालुक्याच्या मागणी प्रमाणे जैविक खते व औषधाचा पुरवठा केला जातो. तसेच मृद चाचणीची नमुने तपासली जातात. |

| | | |
|---|---|---|
| | तालुका बिजगुणन केंद्र | नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार येथे व शहादा तालुक्यात कळंबु येथे असे दोन ताबिके कार्यान्वित आहेत. नंदुरबार ताबिकेचे क्षेत्र ४७.३५ हे. क्षेत्र आहे. तसेच कळंबु येथील क्षेत्र २९.८९ हे. आहे. त्यामध्ये शासकीय इमारती आहेत. व उर्वरित क्षेत्रात खरीप व रब्बी हंगामात बिजउत्पादन कार्यक्रम घेण्यात येतो. पाण्याच्या उपलब्धते नुसार मुलभूत बियाणे पासुन पायाभुत १ तसेच पायाभूत १ पासून प्रमाणीत बियाणेचा बिजोत्पादन कार्यक्रम घेतला जातो. तसेच त्यामध्ये आवश्यकते नुसार गौण बाधकाम करण्यात आले आहे. गौण बांधकाम मध्ये गोडाऊन दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. मा.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नंदुरबार यांच्या नियंत्रणाखाल वरील योजना राबविण्यात येतात. |